MHLA090034292022

**फौज. कि. अर्ज क्र.४८७/२०२३**
**विजयकुमार वि. ग्रामसेवक**

## निशाणी क्र.१ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदाराने जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथन असे आहे की, अर्जदार हा खेर्डा (खुर्द), ता. उदगीर येथील रहिवासी असुन त्याचा मुलगा नामे **ओमकार पि. विजय बिरादार** याचा जन्म स्वगृही दिनांक **२२/१२/२००९** रोजी झालेला आहे. अर्जदाराने किंवा त्याच्या वतीने त्याच्या मुलाच्या जन्माची नोंदणी जन्म व मृत्यु नोंदणी विभाग, ग्रामपंचायत कार्यालय, खेर्डा (खुर्द), ता. उदगीर यांच्या कार्यालयात करण्यात आली नाही.

३. अर्जदाराने अर्जासोबत जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १७ प्रमाणे व महाराष्ट्र जन्म व मृत्यु नोंदणी नियम १९७६ चे कलम १३ प्रमाणे ठेवण्यात आलेल्या नोंद वहीत जन्माची नोंद नसल्यामुळे जन्म नोंद उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र **नि.क्र.३/१** वर दाखल केले आहे. यावरुन असे दिसून येते की, अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, खेर्डा (खुर्द), ता. उदगीर येथील जन्म व मृत्यु अभिलेखात करण्यात आलेली नाही.

४. अर्जदाराच्या वतीने सदर अर्जातील कथनाच्या शाबितीसाठी पुरावा म्हणुन अर्जदाराने स्वतःचे सरतपासणीचे शपथपत्र **नि.क्र.९** वर दाखल केले आहे. तसेच अर्जदाराने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र,

अर्जदाराच्या व त्याच्या मुलाच्या आधार कार्डची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच दैनिक वर्तमानपत्र **यशवंत** मध्ये दि.२१/१०/२०२२ रोजी जाहिर प्रसिध्दी देवुन आक्षेप मागविण्यात आले होते. त्याअन्वये आजपावेतो कोणतेही आक्षेप तथा हरकती दाखल करण्यात झालेल्या नाहीत. अर्जदाराने दाखल केलेल्या शपथपत्रावरुन अर्जदाराच्या मुलाची जन्माची तारीख **२२/१२/२००९** असल्याचे दिसून येते. जन्म व मृत्यु नोंदणी विभाग, ग्रामपंचायत कार्यालय, खेर्डा (खुर्द), ता. उदगीर येथे सदर जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्यामुळे व त्यास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटून गेल्यामुळे जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद नोंदपुस्तकात घेण्याबाबतचा आदेश जन्म व मृत्यु नोंदणी विभाग, ग्रामपंचायत कार्यालय, खेर्डा (खुर्द), ता. उदगीर यांना देणे आवश्यक आहे. म्हणुन मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. ग्रामसेवक, जन्म व मृत्यु नोंदणी विभाग, ग्रामपंचायत कार्यालय, खेर्डा (खुर्द), ता. उदगीर यांना आदेशित करण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा नामे – **ओमकार पि. विजय बिरादार** यांचा जन्म दिनांक **२२/१२/२००९** रोजी झाल्याबाबतची नोंद विहित फी भरुन घेतल्यानंतर संबंधीत नोंद पुस्तकात घेण्यात येवून जन्म प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NIKHIL JEEVANRAO CHAVAN
Date: 2023.07.27 16:56:28 +0530

दिनांक – २७/०७/२०२३.

**(एन.जे. चव्हाण)**

**३रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उदगीर.**